दिनांक  25/04/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.6

विषय – नगरपरिषद हद्दीतील वसंतनगर (विटा सारम ) येथील तलाव सुशोभिकरण करणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.(अं.र.रू.4,98,016/-)

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी नगरअभियंता यांची दिनांक 24/04/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी

नगरपरिषद हद्दीतील वसंतनगर (विटा सारम ) येथील तलाव सुशोभिकरण करणेकामी खालील ई निविदा दाखल आहेत.( अं.र.रू.4,98,016/-)

| | |
|---|---|
| 1) कुलदिप कुंडलिक भिंगारदेवे | अंदाजपत्रकीय दराने |
| 2) प्राजक्ता गजानन निकम | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 3% जादा दराने |
| 3) विक्रांत बाळकृष्ण बागल | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जादा दराने |

उपरोक्त ई निविदापैकी कुलदिप कुंडलिक भिंगारदेवे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे .

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक  25/04/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.7

विषय – नगरपरिषद भूमापन क्र.191 विटा सेंट्रल स्कूल भोवतीचे होर्डिंग्ज हटविणेबाबत गटविकास अधिकारी वर्ग-1, खानापूर पंचायत समिती, विटा यांचे दिनांक 11/04/2023 रोजीचे दाखल अर्जावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी कर निरीक्षक यांची दिनांक 19/04/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी

विटा नगरपरिषदेकडील मा.सर्वसाधारण सभा ठराव नं.102 दि.16/09/2013 नुसार कराड रोड, सेंट्रल स्कूलजवळ डिजिटल फलक लावणेस मंजुरी देणेत आलेली होती.

विटा नगरपरिषद क्षेत्रात नगर भूमापन क्र.191 मधील विटा सेंट्रल स्कूल ही शासकीय इमारत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांचे नावे आहे. सदर इमारतीमध्ये सार्वजनिक वाचनालय आहे. परंतु या इमारतीसमोरील कुंपन भिंतीस लागूल होर्डींग व डिजिटल बोर्ड लावणेत आलेले आहेत. त्यामुळे वाचनालय इमारत दिसून येत नाही व नागरीकांना वाचनालयाबद्दल माहिती होत नाही. तरी इमारतीसमोरील दर्शनी भागातील सर्व होर्डिंग व डिजिटल बोर्ड हटविणेची कार्यवाही करणेबाबतचा गटविकास अधिकारी वर्ग-1, खानापूर पंचायत समिती, विटा यांचा दिनांक 11/04/2023 रोजीचा अर्ज प्राप्त झालेला आहे. तरी सदर विनंती अर्जानुसार स्वच्छ सर्वेक्षण 2023 अंतर्गत स्थानिक कला, संस्कृती आणि वारसा इत्यादी घटकांचे सुशोभिकरण व जतन करणे या अंतर्गत  कराड रोड सेंट्रल स्कूल जवळचे होर्डिंग्ज लावणेचे ठिकाण रद्द करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक 25/04/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.8

विषय – बायोगॅसच्या प्रक्रिया केंद्रामध्ये आत्ता उपलब्ध मशीन पेक्षा जास्त क्षमतेचे क्रशर मशीनची खरेदी करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी आस्थापना सहा.भांडार पर्यवेक्षक यांची दिनांक 21/04/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी

विटा नगरपरिषद विटा घनकचरा प्रकल्प येथे नगरपरिषद मार्फत 5 टन क्षमतेचा बायोगॅस निर्माण करण्यात आला आहे. सदरच्या ठिकाणी ओला कचरा श्रेड करून पाण्यामध्ये मिक्स करून क्रश करून सदरचा पाणी मिश्रित लगदा पुढे प्रोसेसिंग साठी जातो.सदरच्या बायोगॅसच्या ठिकाणी निविदा धारका मार्फत 5 hp क्षमतेचे क्रशर मशीन बसविले होते. परंतु सदरच्या मशीन ची क्षमता अपुरी पडत असून प्रति दिवस 1 टन कचरा प्रक्रिया होत आहे. तसेच त्याची वारंवार दुरुस्ती निघत आहे. बायोगॅसच्या प्रक्रिया केंद्रामध्ये आत्ता उपलब्ध मशीन पेक्षा जास्त क्षमतेचे मशीनची आवश्यकता आहे. तरी सदरचे क्रशर मशीन खरेदी करणेस मंजूरी देत आहे. सदर मशीन खरेदी 15 वित्त आयोग फंडातून करणेत यावी. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा